Pune Police

प्रेसनोट दि. ०१/११/२०१७

## लॉटरी लागल्याचे अमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या कंपनीच्या मालकाला गुन्हे शाखा युनिट १ ने केली अटक

दिनांक ३१/१०/२०१७ रोजी पो.शि. प्रशांत गायकवाड यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, नविन सिमकार्ड घेणाऱ्या लोकांना त्यांचे मोबाईल नंबर प्राप्त करुन घेवून त्यांना फोन करून तुमचा मोबाईल नंबर कंपनीकडून सिलेक्ट झालेला आहे, व तुंम्हाला लॉटरी लागली आहे, व त्यामध्ये तुंम्हाला १८९९/- रु.चे बक्षीस लागले आहे, व त्यामध्ये एचएमटी कंपनीचे घडयाळ व गोल्ड प्लेटेड असलेली सोन्याची अमेरीकन डायमंड चैन, आपणास फक्त ५५०/- रु. मध्ये देणार आहेत असे अमिष दाखवून, लोकांचा विश्वास संपादन करून, लोकांकडून ५५०/- रुपये घेवून त्यांना ७० रुपयाचे बनावट एच.एम.टी. कंपनीचे घडयाळ व ७० रुपयाची बनावट सोन्याची अमेरीकन डायमंड चैन असे पार्सलमध्ये टाकून लोकांना देवून त्यांची फसवणूक केली आहे.

सदर बाबत फिर्यादी महेंद्र दत्तात्रय सोनवणे, रा. संगमवाडी, पुणे यांना दि. २७/१०/२०१७ रोजी त्यांचेकडून ५५०/- रु. घेवून त्यांना लॉटरी लागलेचे पार्सल दिले होते. ते त्यांनी उघडून पाहिले असता, त्यामध्ये बनावट एच.एम.टी कंपनीचे बनावट घडयाळ व बनावट सोन्याची अमेरीकन डायमंड चैन मिळून आली. त्यावरून फिर्यादी यांनी शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिलेने वैदीक बाजार कंपनीचे मालक बालाजी रामचंद्र मद्दीपटला, वय ३२ वर्षे, रा. ३११, हिमालया हाईट्स, फातिमानगर चौक, वानवडी, पुणे याचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपी हा शिवाजीनगर येथे फिर्यादीस दुसऱ्यांदा फोन करून लॉटरीचे पार्सल देण्यासाठी आला असतांना त्यास युनिट १ कडील अधिकारी व कर्मचारी यांचे मार्फत अटक करण्यात आली आहे. त्याचेकडे अधिक चौकशी करता त्याने सप्टेंबर २०१७ पासून वैदीक बाजार नावाची कंपनी सुरु करून मागील दिड महिन्यात पुणे शहर व आजुबाजूच्या परिसरातील जवळजवळ २१०० लोकांना अशा प्रकारे फसविलेचे उघड झाले आहे.

त्याचेकडून त्याचे रहाते घरातून ६५० बनावट एच.एम.टी कंपनीचे घडयाळ व बनावट सोन्याची अमेरीकन डायमंड चैन असा किं. रु. ९०,०००/- चा माल मिळून आला आहे. सदर आरोपीस दि. ३१/१०/२०१७ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख सो. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक हर्षल कदम, पो.शि. प्रशांत गायकवाड, गजानन सोनुने, पो.हवा. रिजवान जिनेडी, पो.हवा. उमेश काटे, सुभाष पिंगळे, स.पो.फौज. राजाराम सुर्वे, विजेसिंग वसावे, पो.हवा. प्रकाश लोखंडे, अशोक माने, राजू पवार, इरफान मोमिन, श्रीकांत वाघवले, तुषार खडके, सचिन जाधव, इम्रान शेख, मोहन येलपले, यांनी केली आहे.


युनिट १


युनिट १